| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHOS090031572024 | दाखल दिनांक | :- | २८/११/२०२४ | | |
| | नोंदणी दिनांक | :- | २८/११/२०२४ | | |
| | निकाल दिनांक | :- | ११/०६/२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०१ | ०६ | १४ |

**भाग अ**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(i) अन्वये]**

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.३) कळंब, ता. कळंब,**

**जि. धाराशिव यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी - अमृता धोंडीराम जाधव)**

न्यायनिर्णय घोषित दिनांक ०९/०६/२०२६

| | |
|---|---|
| नि. फौजदारी खटला क्र. १८३/२०२४ | निशाणी क्र. ४२ |
| गुन्हा नोंदणी क्रमांक. ११२/२०२४ | पोलीस स्टेशन- शिराढोण |

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत - पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, शिराढोण,<br>ता. कळंब, जि. उस्मानाबाद. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्री. एस. टी. वैद्य |
| **विरुध्द** | |
| आरोपी | १.शंकर श्रीधर पालकर,<br>वय ७२ वर्षे,<br>२.विनायक श्रीधर पालकर,<br>वय ४८ वर्षे,<br>३.जगन्नाथ श्रीधर पालकर,<br>वय ६५ वर्षे,<br>४.किरण जगन्नाथ पालकर,<br>वय ३२ वर्षे,<br>सर्व रा. सौंदना आंबा,<br>ता. कळंब, जि. धाराशिव |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | श्री. एन.डी. पाटील |

## भाग ब

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०५/०६/२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक | ०५/०६/२०२४ |
| दोषारोप दाखल दिनांक | २४/११/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०७/०४/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०७/०४/२०२५ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ११/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ११/०६/२०२६ |
| दोषी ठरवल्याचा दिनांक, जर असल्यास | -- |

## आरोपींची सविस्तर माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १)<br>२)<br>३)<br>४) | शंकर श्रीधर पालकर<br>विनायक श्रीधर पालकर<br>जगन्नाथ श्रीधर पालकर<br>किरण श्रीधर पालकर | कलम ४१(१)(अ) सी.आर.पी.सी. प्रमाणे नोटीस | | भा.द.वि. चे कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे | निर्दोष. | --- | --- |

## भाग क

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(iii) अन्वये]**

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | गोपीनाथ श्रीधर पालकर | फिर्यादी | ३१ |

### ब. आरोपींतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ३२ | फिर्यादवरील सहीस ओळखीपुरते |
| १. | ३३ | घटनास्थळ पंचनामा/आरोपीतर्फे मान्य |
| २. | ३४ ते ३७ | चेहरापट्टी फॉर्म |
| ३. | २१ ते २४ | आरोपीचे निवेदन |

### ब. आरोपींतर्फे पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

### क. न्यायालयीन पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | निरंक |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ११ जून,२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (यानंतर संक्षिप्तपणे 'भा.दं.वि.' असे संबोधण्यात येत आहे) चे कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे कीः-**

**२.** गोपीनाथ पालकर (येथुन पुढे 'फिर्यादी' संबोधण्यात येईल) यांनी दिनांक ०५/०६/२०२४ रोजी शिराढोण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की, दिनांक ०५/०६/२०२४ रोजी फिर्यादी यांचे शेतात पत्र्याचे शेड उभे करण्यास चालू होते. पत्र्याचे शेड उभे करण्यास बाळासाहेब काळदाते यांना गुत्ते दिले होते. त्यांचे सालगडी विक्रम गायकवाड व विष्णू गायकवाड हे काम करत होते. फिर्यादी त्यांचे घरुन शेताकडे मोटारसायकलने येत असताना सामाईक शेतावर असताना आरोपी क्र. १ ते ४ यांनी फिर्यादीस अडवुन तु पत्र्याचे शेड का उभे करतो असे म्हणून लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यावेळी धर्मराज यांनी सोडवासोडव केली. आरोपींनी फिर्यादीस धमकी दिली की तु जर पत्र्याचे शेड उभे केले तर तुला जीवंत सोडणार नाही. त्यामुळे त्यांनी सदर आशयाची फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादवरून शिराढोण पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.११२/२०२४, भा.द.वि. कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला.

**३.** तपासादरम्यान तपासीक अंमलदार यांनी घटनेशी संबंधित असलेल्या साक्षीदारांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १६१ प्रमाणे जबाब नोंदविले.

तसेच घटनास्थळाचा पंचनामा आणि जप्ती पंचनामा तयार करुन, तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप-पत्र सादर केले.

**४.** दोषारोप-पत्र व त्यासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन करुन व आरोपीची बाजू ऐकून निशाणी क्र.२० अन्वये आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत दोषारोप निश्चित केला. उक्त दोषारोप आरोपीला त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला असता, त्याने तो अमान्य असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली.

**५.** अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी अभियोग पक्ष साक्षीदार क्र.१ गोपीनाथ श्रीधर पालकर यांना निशाणी ३१ अन्वये तपासण्यात आले आहे. फिर्यादीने निशाणी ३९ वर प्रकरण पुढे चालविण्याचे नाही याबाबतची पुरसीस दाखल केली आहे. त्यानंतर नि.क्र. १ च्या आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द दोषात्मक पुरावा न मिळून आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** मी अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एस.टी. वैद्य व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एन.डी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचे कथन साक्षीदारांचे जबाब दाखल झालेले दस्तऐवज आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणेमिमांसासह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपीने सौंदना आंबा शिवारातील सामाईक शेताचे रस्त्यावर मोटारसायकल अडविली ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपीने फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत केली ? | नाही |
| ३. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानित केले व त्याच्याकडून शांततेचा भंग झाला? | नाही |
| ४. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपीने फिर्यादीस धाकदपटशा दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली ? | नाही |
| ५. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ४ बाबतः-**

**७.** सर्वप्रथम नमुद करणे आवश्यक आहे की, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आला आहे. सदर दोषारोप वाजवी संशयापलिकडे जाउन सिध्द करण्याची जबाबदारी ही अभियोगपक्षाचीच आहे. आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने पुढील गोष्टी प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

**८.** दोन्ही बाजुचा युक्तीवाद मी काळजीपूर्वक ग्रहण केला. अभिलेखावरील कागदपत्रे व पुराव्याचे मी बारकाईने अवलोकन केले.

**९.** सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी साक्षीदार गापीनाथ श्रीधर पालकर यांची साक्ष निशाणी क्र. ३१ अन्वये नोंदविण्यात आली. त्यांनी पुराव्यात असे कथन केले की, आरोपी क्र.१ ते ३ हे त्यांचे भाऊ असून आरोपी क्र.४ हा त्यांचा पुतण्या आहे. आरोपी व त्यांचेमध्ये घटना ही दिनांक

०५/०६/२०२४ रोजी घडली होती. घटना म्हणजेच त्यांचे शेतात शेड उभे करण्याकरीता गेले होतो त्यावेळेस आरोपी यांनी शेड उभे करण्यास विरोध दाखविला व त्यावरुन त्यांच्यात तु मी झाली. तसेच शाब्दीक बोलाचाली झाली. या व्यतिरिक्त अन्य काहीही घडलेले नाही. त्यानंतर मी पोलीस स्टेशन शिराढोण येथे जावून आरोपीविरुध्द तक्रार दिली. त्यांना अभिलेखावरील फिर्याद दाखविण्यात आली. फिर्यादीतील मजकूर त्यांनी नाकारला. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान फिर्यादीवर त्यांची सही असल्याचे मान्य केले, परंतू त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे. फिर्यादीने अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य न केल्यामुळे अभियोग पक्षातर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांनी त्यांच्यात व आरोपीमध्ये तडजोड होवुन प्रकरण मिटवल्याचे मान्य केले आहे. एकंदरीत, फिर्यादीने अभियोग पक्षाच्या कथनास कोणतेही समर्थन अथवा कबुली दिलेली नाही.

**१०.** अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणात आरोपीने घटनास्थळ पंचनामा कबुल करुन त्याबाबत वाद घातलेला नाही. कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६, सह ३४ अन्वये दोषारोप सिध्द करण्याकरीता आवश्यक पुरावा सरकार पक्षाने अभिलेखावर आणण्यात अयशस्वी ठरले आहे.

**११.** पुराव्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये फिर्यादीसोबत मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली व पत्रयाचे शेड बांधू नको असे नमुद आहे. परंतु असे जरी असले तरी स्वतः घटनेतील फिर्यादी साक्षीदाराने मुळात कोणतेही भांडण न झाल्याचे स्पष्टपणे नाकबुल केलेले आहे. अशा परिस्थितीत सदर परिस्थितीजन्य पुराव्यातून कोणताही फायदा अभियोग पक्षास होणार नाही.

**१२.** थोडक्यात अभियोग पक्षाने तपासलेले फिर्यादी हे प्रस्तुत प्रकरणातील महत्त्वाचे साक्षीदार असताना सुध्दा त्यांनी तथाकथीत घटनेबाबत कोणतेही कथन केलेले नाही. अशा परिस्थितीत फिर्यादी यांचा कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे माझ्या मते भा.दं.वि. चे कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६, सह ३४ प्रमाणे आरोपीवर दोषसिध्दीसाठी असणारे महत्वाचे घटक अभियोगपक्षाने वाजवी

संशयापलीकडे जाउन सिध्द केलेले नाहीत.

**१३.** अशा परिस्थितीत, अभियोग पक्ष आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरला आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याइतपत आवश्यक घटक/पुरावा अभिलेखावर नसल्यामुळे आरोपीची मुक्तता करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चा निष्कर्ष हा नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ५ बाबतः-**

**१४.** मुद्दा क्र. १ ते ४ च्या निष्कर्ष प्राप्तीनुसार भा.दं.वि. चे कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६, सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपीविरुध्द सिध्द करण्यास अभियोग पक्ष पूर्णपणे अपयशी ठरला आहे. त्यामुळे वरील सर्व पुराव्याच्या विश्लेषणावरुन माझ्या मते आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामी, मुद्दा क्रमांक ५ च्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ शंकर श्रीधर पालकर, २. विनायक श्रीधर पालकर, ३. जगन्नाथ श्रीधर पालकर आणि ४. किरण जगन्नाथ पालकर, सर्व रा. सौंदना आंबा, ता. कळंब, जि. धाराशिव यांची भारतीय दंड विधानचे कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६, सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांमधून फौजदारी प्रकिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके व जामीनकतबे रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७-अ अन्वये रक्कम रुपये १५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा जो अपील कालावधी संपुष्टात येईपर्यंत वैध राहील. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

**स्वाक्षरीत/-**
**(अमृता धोंडीराम जाधव)**
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग
कळंब (कोर्ट क्र.३)

**दिनांकः** ११/०६/२०२६
**ठिकाणः-** कळंब

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | -- | Prashant Sunita S. Ovhal,<br>Stenographer (Grade-III) |
| Name of the Court | -- | In the Court of 3rd Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C. Kallam. |
| Date of dictation | -- | 11/06/2026. |
| Order signed by the Presiding Officer on | -- | 11/06/2026. |
| Order uploaded on | -- | 11/06/2026. |